वाचलेः- १. मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांनी दिनांक १८ डिसेंबर, २०२४ इ. रोजी प्रसिध्द् केलेली शिपाई संवर्गातील उमेदवार यांची निवड यादी.

२. मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/२२६ दि. १६ मे २०२५ अन्वये न्यायिक जिल्हा कोल्हापूर येथे दिवाणी न्यायाधीश, वरिष्ठ स्तर संवर्गातील न्यायिक अधिकारी यांचे नियुक्ती संदर्भात...

३. मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/०९, दि. ०३ जानेवरी, २०२५ अन्वये शिपाई पदाचे निवड यादीमधील अनुकमांक १ कडील श्री. किशोर सर्जेराव वरपेपाटील व अनुकमांक ४ कडील श्री. सुशांत बळवंत पाटील हे त्यांचे नेमणूकीचे ठिकाणी शिपाई पदावर दिलेल्या मुदतीत रुजू न झालेमुळे निवड यादीमधून त्यांची नांवे वगळण्यात आलेबाबत...

४. मे. जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचेकडील आदेश क्रमांक प्रशासन ३६/४१, दि. १७ जानेवरी, २०२५ अन्वये शिपाई पदाचे निवड यादीमधील अनुकमांक ६ कडील श्री. भरत नारायण गायकवाड हे त्यांचे नेमणूकीचे ठिकाणी शिपाई पदावर दिलेल्या मुदतीत रुजू न झालेमुळे निवड यादीमधून त्यांची नांवे वगळण्यात आलेबाबत...

५. प्रभारी प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर यांचा दिनांक ०५ मे, २०२५ इ. रोजीचा कार्यालयीन अहवाल व त्यावरील निम्नस्वाक्षरीत यांचा दिनांक ०५ मे, २०२५ इ. रोजीचा आदेश.

आदेश कमांक (प्रशासन) ३६/२६९

वरील अनुषंगाने प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर हे वर नमुद संदर्भ कमांक "१" नुसार **शिपाई** पदी निवड झालेले उमेदवार यांचे प्रथम नेमणुकीसंदर्भात खालीप्रमाणे आदेश पारीत करीत आहेत :

अ. क.	शिपाई निवड यादीमधील अनुकमांक	उमेदवाराचे नाव व पत्ता	नेमणुकीचे ठिकाण
१	३६	**ओंकार जगन्नाथ सोनवळे,** राहणार मु.पो. साईनगर, जुनी पाणीची टाकी, ता. इस्लामपुर, सांगली, ४१५४०९	दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, **जयसिंगपूर** येथे नवनिर्मित न्यायालयात

अ. क.	शिपाई प्रतिक्षा यादीमधील अनुकमांक	उमेदवाराचे नाव व पत्ता	नेमणुकीचे ठिकाण
२	३७	**प्रथमेश मनोहर माने,** राहणार घाटगे मळा, शाहू कारखान्याजवळ, यशवंत मोहिते नगर, कागल, जिल्हा-कोल्हापूर ४१६२१६.	दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, **कोल्हापूर** येथे नवनिर्मित न्यायालयात.
प्रतिक्षा यादीतील उमेदवार			
३	१	**बिरप्पा बिरगोंडा लोणीकर,** राहणार मु. पो. सगरोळी, ता. बिलोळी, नांदेड, ४३१७३१.	दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, **कोल्हापूर** येथे नवनिर्मित न्यायालयात.
४	२	**सुनिल आण्णा नाडे,** राहणार समाज मंदीर जवळ, हिंगणगाव, हातकणगले, कोल्हापूर ४१६१११.	दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, **कोल्हापूर** येथे नवनिर्मित न्यायालयात.
५	३	**प्रसाद नारायण जाधव,** राहणार अंबाबाई तालीम जवळ, श्रीराम हॉलचे पाठीमागे, मालगाव वेस, ब्राम्हणपुरी, मिरज, सांगली. ४१६४१०.	जिल्हा न्यायालय-१ व अतिरीक्त सत्र न्यायालय, **इचलकरंजी** येथे श्री. संतोष आर. पाटील यांचे बदलीमुळे

वर नमुद उमेदवार यांची नेमणुक संबंधीत पदावर तात्पुरते / तदर्थ स्वरुपात करणेत येत आहे. उपरोक्त उमेदवारांची वेतननिश्चिती एस-१, वेतनबॅण्ड रक्कम रुपये १५,०००-४७,६०० या सुधारीत वेतन संरचनेत रुपये १५,०००/- या मुळ वेतनावर निश्चित करणेत येत आहे.

वर नमुद उमेदवार यांनी यासोबत जोडणेत आलेला विहीत साक्षांकन नमुना भरुन कार्यालय प्रमुख यांचेमार्फत या कार्यालयाकडे तात्काळ पाठवून देणेचा आहे. उपरोक्त नमुन्यामध्ये उमेदवार यांनी आधार ओळखपत्र कमांक, पॅन कार्ड कमांक तसेच उमेदवारांच्या कुटुंबातील सदस्य परदेशात अध्ययन करीत असल्यास अथवा राहत असलेस त्याबाबतची माहिती समाविष्ट करणे अनिवार्य राहील.

उपरोक्त उमेदवार यांनी दिनांक ०९ जून, २०२५ इ. रोजी अगर तेथून पूढे ०४ दिवसांत (सुट्टीचे दिवस वगळून) त्यांचे नेमणुकीचे ठिकाणी संबंधीत न्यायालयात हजर राहावे अन्यथा त्यांची नेमणुक तदर्थ स्वरुपाची असलेने ती आपोआप रद्द होईल आणि शिपाई पदाचे निवड/प्रतिक्षा यादीमधून त्यांचे नाव कमी करणेत येईल याची नोंद घ्यावी.

उपरोक्त उमेदवार यांना कामावर रुजू झालेनंतर सदर कार्यालयीन अटी व शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्र व एकनिष्ठतेचे शपथपत्र द्यावे लागेल. तसेच त्यांना वैद्यकीय तपासणीसाठी पाठविण्यात येईल व वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याबाबतचे प्रमाणपत्र अनिवार्य असेल. जर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असेल तर या कार्यालयास १ महिन्याची आगाऊ लेखी सुचना दिली पाहिजे, किंवा तसे न करता राजीनामा दिलेस १ महिन्याच्या लेखी सुचनेऐवजी १ महिन्याचे वेतना इतके रोख रक्कम (वेतन संरचनेतील (Matrix) वेतन) या कार्यालयात जमा केली पाहिजे.

उमेदवारांनी नेमणुकीच्या ठिकाणी हजर होताना त्यांचा स्वतःचा मुळ फोटो असलेले ओळखपत्र (पॅन कार्ड, ड्रायव्हींग लायसेन्स, आधार कार्ड इ. यापैकी एक) यासह हजर व्हावे.

महाराष्ट्र शासन निर्णय क. अंनियो १००५/१२६/ सेवा-४, मंत्रालय, मुंबई ४०००३२, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ आणि शासन निर्णय कमांक अंनियो १००७/१८/ सेवा-४, दिनांक ०७ जुलै, २००७ नुसार असे सुचित करणेत येते की, "१ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर त्यांची शासकीय सेवेत नियुक्ती होताच त्यांना नवीन परिभाषिक अंशदान निवृत्तीवेतन योजना लागु ठरेल मात्र सद्या अस्तित्वात असलेली निवृत्तीवेतन योजना (म्हणजे महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सध्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना त्यांना लागु होणार नाही."

जिल्हा व सत्र न्यायालय, { }
कोल्हापूर ४१६ ००६. { }
दिनांक : ०५/०६/२०२५ { }

(कविता बि. अग्रवाल)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
कोल्हापूर

प्रत माहितीसाठी व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित :-

१) मा. जिल्हा न्यायालय - १ , **इचलकरंजी.**

१) मा. दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, **कोल्हापूर / जयसिंगपुर.**

२) अधिक्षक, (वित्त / प्रशासन विभाग) जिल्हा व सत्र न्यायालय, **कोल्हापूर**

प्रत माहितीकरीता व पुढील कार्यवाहीकरीता ईमेलद्वारे रवाना :-

१. **ओंकार जगन्नाथ सोनवळे,** राहणार मु.पो. साईनगर, जुनी पाणीची टाकी, ता. इस्लामपुर, सांगली, ४१५४०९ (omkarsonavale734@gmail.com)
२. **प्रथमेश मनोहर माने,** राहणार घाटगे मळा, शाहू कारखान्याजवळ, यशवंत मोहिते नगर, कागल, जि-कोल्हापूर ४१६२१६. (maneprathamesh101@gmail.com)
३. **बिरप्पा बिरगोंडा लोणीकर,** राहणार मु. पो. सगरोळी, ता.बिलोळी, नांदेड, ४३१७३१. (birappa026@gmail.com)
४. **सुनिल आण्णा नाडे,** राहणार समाज मंदीर जवळ, हिंगणगाव, हातकंणगले, कोल्हापूर ४१६१११. (sunilnade78@gmail.com)
५. **प्रसाद नारायण जाधव,** राहणार अंबाबाई तालीम जवळ, श्रीराम हॉलचे पाठीमागे, मालगाव वेस, ब्राम्हणपुरी, मिरज, सांगली. ४१६४१०. (prasadjadhav.2125@gmail.com).

प्रभारी प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर